नियमीत फौजदारी खटला क्र. ७९/२०२१
निशाणी क्र. **१६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रतिक्षा प्रमोद राणे** |
| वय सुमारे | : | ५० वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहा.सरकारी वकील श्रीमती वैशाली बंगेरा यांचेमार्फत:</u>**

दि. २६/०४/२०२१ रोजी सायं. ०४.१५ वाजता आवास येथील मौजे टेकाळी येथे घटना घडली. मी व माझा मुलगा ओंकार आमच्या शेतात काम करत होतो. माझे पतीने तेथे जेसीबी बोलावला होता. आम्ही जेसीबीने साफसफाई करत होतो. तेथे अंदाजे ४.३० वाजता आरोपी आला व आम्हाला शिवीगाळ करु लागला. त्याच्या हातात बांबूची काठी होती. त्याने आम्हाला, 'कोणाच्या परवानगीने जेसीबी लावला? असे म्हटले. मी त्याला म्हटले की, सदर जमीन वडीलोपार्जित आहे व आमच्या ताब्यात आहे म्हणून आम्ही काम करत आहोत. आरोपी आम्हाला शिवीगाळ करुन म्हणत होता की, येथे काम करायचे नाही, ही आमची जागा आहे.

०२. त्यानंतर त्याने माझे मुलाला हाताबुक्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. आमचा आरडाओरड ऐकून शशिकांत राणे व महेश राणे तेथे आले. आरोपीने मला धरले व माझी छाती दाबली. माझा मुलगा मला सोडवण्याचा प्रयत्न करत होता. आरोपीचा तोल जावून तो खाली पडला. तेथे प्रकाश ठाकूर आला व त्याने भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. शशिकांत राणेने आरोपीला समजावण्याचा

प्रयत्न केला परंतु तो ऐकत नव्हता. त्यानंतर तेथे आरोपीचा भाऊ सुरेंद्र कवळे तेथे आला व आरोपीला घेवून गेला.

०३. त्यानंतर आम्ही पोलीस ठाणे मांडवा सागरी येथे गेलो व तक्रार दाखल केली. तक्रारीतील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. तक्रार **निशाणी क्र.१७** वर आहे. सदर घटनेच्या छापील प्रथम खबरी अहवालातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. सदर छापील प्रथम खबरी अहवाल **निशाणी क्र.१८** वर आहे. आरोपी न्यायालयात हजर आहे. जी वस्तू त्या दिवशी आरोपी घेवून आला होता ती दाखविल्यास मी ओळखू शकेन.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत** :

०४. दि. २६/०४/२०२१ रोजी विश्वनाथ कलभुर्गे, माझा मुलगा व माझेविरुद्ध आम्ही आरोपीला मारहाण केल्याबाबतची तक्रार दाखल झाली होती. माझे मुलाला या मारहाणीत जखमा झालेल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, दि. २६/०४/२०२१ रोजी आमच्या आधी आरोपी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गेला होता व त्याने सर्वप्रथम आमच्याविरुद्ध तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पोलीस ठाण्यात गेलो त्यावेळी आरोपीला उपचारासाठी रुग्णालयात पाठविले होते. आरोपीला व आम्हाला एकामागून एक उपचारासाठी रुग्णालयात पाठविले होते. आरोपीच्या डोक्याला जखम होती.

०५. आम्ही पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलीसांनी आम्हाला सांगितले की, आरोपीने कलभुर्गे, माझा मुलगा व माझेविरुद्ध तक्रार दाखल केलेली आहे. त्या तक्रारीमध्ये आरोपीने, मी त्याच्या डोक्यात मारहाण केली तसेच माझे मुलाने

त्याला दगडाने मारले असे आरोप केलेले आहेत.

०६. ०४.१५ वाजता जेसीबी आम्ही मागविला होता. ज्या ठिकाणी तथाकथीत घटना घडली त्याचा गट क्र. २५९ (जुना गट क्र. २४६/९) असा आहे, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर जागा आरोपीच्या वडीलांनी राजाराम मांदळे व सुभाष मांदळे यांच्याकडून सन १९९० मध्ये नोंदणीकृत खरेदीखताद्वारे विकत घेतलेली होती व आहे. ब–याच वर्षांपासून आमच्यात व आरोपीच्या वडीलांमध्ये ताब्यावरुन वाद सुरु होता. जिथे जेसीबी लावलेला होता त्याच्या आजूबाजूच्या झाडांमध्ये एक आठवड्याआधी जाळपोळ झाली होती. सदर जाळपोळ व साफसफाई मी व माझे मुलाने केली होती. त्या गोष्टीला आरोपी व त्याच्या वडीलांनी हरकत घेतली होती. ज्या जागेवर घटना घ डली त्या जागेच्या ताब्याबाबत न्यायालयात दावा प्रलंबित आहे.

०७. दि. २६/०४/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता, जागेत आम्ही जाळपोळ केली म्हणून आरोपीच्या वडीलांनी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात अर्ज केला होता, हे मला माहीत नाही. या जागेमध्ये आमच्या वावर करण्याला आरोपीच्या वडीलांची हरकत होती. दि. २६/०४/२०२१ रोजी ०४.३० वाजता आरोपी घटनास्थळी आला. तेथे बाचाबाची झाली होती. त्याने, जेसीबीचे काम थांबवा अशी मागणी केली होती. आम्ही काम थांबवायला तयार नव्हतो. जेसीबीचे काम सुरु होते व त्यामुळे छोटीमोठी झाडे तुटलेली होती. जेसीबीचा चालक जेसीबी चालवित होता. ५–१० मिनिटे जेसीबी थांबवण्यावरुन आमच्यात वाद सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी जेसीबी पुढे आडवा झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा ओंकार याने आरोपीची कॉलर पकडून त्याला खाली

पाडले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाने पहिल्यांदा त्याच्या डोक्यात दगड घातला. हे म्हणणे खरे नाही की, मी बांबूच्या काठीने त्याला झोडी घातल्या. आरोपी व आमच्या तिघांव्यतिरिक्त तेथे कोणीही नव्हते.

०८. हे म्हणणे खरे नाही की, महेश राणे व शशिकांत राणे यांची घरे पायी गेल्यास अंदाजे १५—२० मिनिटांच्या अंतरावर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडताना प्रत्यक्ष अन्य कोणीही पाहिलेली नाही. ब—याच वर्षांपासून आमच्या व आरोपीच्या कुटुंबामध्ये वाद सुरु आहे. आरोपी ब—याच वर्षांपासून आमच्या घरी आला नाही व आम्ही सुद्धा त्याच्या घरी गेलो नाही. आरोपीने इतक्या वर्षात माझी कधीही छेड काढली नाही व बोलण्याचाही प्रयत्न केला नाही. आरोपी वयाने माझेपेक्षा लहान आहे. घटना घडली तोपर्यंत आरोपीने माझेकडे वाईट हेतूने बघितले नाही.

०९. तक्रार दाखल करण्याचा निर्णय मी व माझ्या मुलाने घेतला. आरोपी व माझ्या मुलामध्येच मारामारी झाली होती. विश्वनाथ कलभुर्गे जागेवर हजर होता. मी त्यांची मारामारी सोडवण्याच्या प्रयत्नात होते व त्या प्रकरणात मलाही धक्काबुक्की झाली. हे म्हणणे खरे नाही की, धक्काबुक्कीच्या कारणावरुन मी तक्रार दाखल करायचा निर्णय घेतला. अंदाजे ०४.३० वाजता घटना घडली. घ टनास्थळापासून पोलीस ठाण्यात मोटरसायकलने गेल्यास १० मिनिटे लागतात. मी तक्रार रात्री १०.३० वाजता दिली. साक्षीदार स्वतः सांगते की, रुग्णालयातून उपचार घेवून आल्यानंतर तक्रार दिली.

१०. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने, विश्वनाथ कलभुर्गे, माझा मुलगा व माझ्याविरुद्ध तक्रार दिली त्यामुळे मी आरोपीविरुद्ध खोटी तक्रार दाखल केली

आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझी छाती दाबली हे मी खोटे सांगत आहे. ग्रामपंचायतीमध्ये महेश राणे, शशिकांत राणे व कलभुर्गे यांच्याविरुद्ध आरोपीने तक्रारी दाखल केलेल्या आहेत, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला व माझ्या मुलाला कोणतीही मारहाण झालेली नसतानाही आरोपीविरुद्ध खोटी तक्रार दाखल केलेली आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | समक्ष |
| ( **शै. वा. उगले** ) | ( **शै. वा. उगले** ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. | मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. |

अलिबाग.
दिनांक : **०८/११/२०२२**.

**<u>निशाणी क्र. २९ कडील आदेशान्वये सरतपास सुरु</u> :**

११. (साक्षीदाराने मुद्देमाल क्र. २४/२०२३ कडील लाकडी बांबू बघितला.) सदर लाकडी बांबू तोच आहे. तो आर्टीकल 'अ' कडे आहे.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील निवेदिता वाघमारे यांचेमार्फत** :

१२. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल 'अ' कडील काठीने मी आरोपीला मारहाण केली होती व बांबू तेथेच टाकून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस

ज्यावेळी पंचनाम्यासाठी आले होते त्यावेळी मी आरोपीला मारहाण केलेला बांबू पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल 'अ' कडील बांबूने मारहाण केली होती, हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत                                                  समक्ष

( **शै. वा. उगले** )                                    ( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.   मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.
दिनांक : **०९/०५/२०२३**.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७९/२०२१**
निशाणी क्र. **२५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **दिपाली मारुती पाटील** |
| वय सुमारे | : | ४० वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील |
| निवासस्थान | : | मु. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहा.सरकारी वकील श्रीमती वैशाली बंगेरा यांचेमार्फत</u>** :

दि. २७/०४/२०२१ रोजी मांडवा पोलीस ठाण्यातील वाघमारे पोलीसांनी मला टेकाळी आवास–झिराड रस्त्याजवळील मिळकतीत बोलावले होते. पोलीसांनी पंचनामा करायचे असल्याचे सांगितले होते. मी पंच म्हणून हजर राहण्यास संमती दर्शविली.

०२. त्यानंतर मी, हवालदार वाघमारे व निलेश भगत असे आम्ही टेकाळी आवास–झिराड रस्त्याजवळील फिर्यादीच्या मिळकतीत गेलो. तेथे आमच्या व्यतिरिक्त फिर्यादी व दोन पोलीस होते. फिर्यादीने घटनास्थळ दाखविले. घटनास्थळाजवळ ताडाचे झाड होते. ताडाच्या झाडापासून अंदाजे २५ फुट अंतरावर घटना घडली होती. प्रतिक्षा राणे यांनी घटनेबाबत सांगितले होते.

०३. पश्चिमेस झाडीमध्ये एक जुनी बांबूची काठी होती. सदर काठी जमा करुन त्यावर पोलीसांनी लेबल लावले व त्यावर मी सही केली. पोलीसांनी पंचनामा करुन माझ्या सह्या घेतल्या. पंचनाम्यातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. सदर पंचनामा **निशाणी क्र.२६** कडे आहे. पंचनामा अंदाजे ११.३० वाजता सुरु केला व १२.४५ वाजता संपला. जप्त केलेली बांबूची काठी दाखविल्यास मी ओळखू शकेन.

**मुद्देमाल जमा करेपर्यंत उर्वरीत सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**

समक्ष

अलिबाग. **( शै. वा. उगले )**
दिनांक : **१२/०१/२०२३.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>पुढील सरतपास सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>** :

०४. (साक्षीदाराने आर्टीकल 'अ' कडील काठी बघितली.) सदर काठी तिच आहे.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत</u>** :

०५. मी ज्या घटनास्थळावर गेले होते ते घटनास्थळ कोणाच्या मालकीचे होते याची मी माहिती घेतली नाही. त्या ठिकाणी झाडांची तोडातोड झालेली असल्याचे दिसत होते. झाडाच्या फांद्या, इतर काठ्या व पालापाचोळा तेथे पडलेला होता.

प्रश्न **:** तेथे पडलेली एक काठी पोलीसांनी ताब्यात घेतली?

उत्तर **:** प्रतिक्षा राणेने सांगितले व त्यानंतर पोलीसांनी तेथील एक काठी ताब्यात घेतली.

हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल 'अ' कडील काठीला कोणतीही विशिष्ट खूण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर काठीवर माती, रक्त किंवा केस माझ्या निदर्शनास आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिक्षा राणेने पोलीसांना काठी दिली, पोलीसांनी ती जप्त केली व माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा तयार केला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील असल्याने पोलीसांनी तयार केलेल्या खोट्या पंचनाम्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल 'अ'

कडील काठीचा आरोपींशी काहीही संबंध नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.
दिनांक : **२५/०७/२०२३**.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७९/२०२१**
निशाणी क्र. **५३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **शशिकांत धर्मा राणे** |
| वय सुमारे | : | ६५ वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना कधी घडली ते मला आठवत नाही. काय झाले होते ते मला आठवत नाही. माझ्या समक्ष मारहाणीचा प्रकार घडला नाही.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे मला माहीत नाही की, मी बांधकामाला पाणी घालत असताना आरोपींनी शिवीगाळ केली. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकीत भाग 'अ' वाचून दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदरचा मजकूर माझ्या जबाबात का नमूद आहे याचे कारण मी सांगू शकत नाही.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेतर्फे निवेदिता वाघमारे यांचेमार्फत</u>**:

उलटतपास नाकारला.
उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१४/०८/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७९/२०२१**
निशाणी क्र. **५४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **ओमकार प्रमोद राणे** |
| वय सुमारे | : | २७ वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड |

<u>**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत**</u> :

दि. २६/०४/२०२१ रोजी सायं. ४.१५ वाजताच्या सुमारास घटना घडली. मी व माझी आई प्रतिक्षा राणे असे शेतात काम करत होतो. माझ्या वडीलांनी विश्वनाथ कलभुर्गे यास शेतातील जंगली झाडे जेसीबीच्या सहाय्याने उपटण्यास सांगितले. त्याप्रमाणे विश्वनाथ कलभुर्गे जंगली झाडे उपटत होते. तेव्हा आमच्या गावातील महेंद्र मच्छिंद्र कवळे हे हातात बांबूची काठी घेवून जेथे झाड उपटण्याचे काम चालू होते त्या शेतात आले व जेसीबी कोणाच्या परवानगीने आत आणली, या जमिनीवर तुमचा कोणताही अधिकार नाही असे बोलून त्याने मला हाताबुक्यांनी मारहाण केली. बाजूला असलेले महेश राणे हे झाडाला पाणी घालत होते ते तेथे आरडाओरडा ऐकून आले. तसेच शशिकांत राणे हे घराच्या बांधकामाला पाणी घालत होते ते देखील आवाज ऐकून आले. त्यांनी आमचे भांडण सोडविले. 'जेसीबी बाहेर जावू द्या' असे महेंद्र कवळे म्हणाले. माझी आई म्हणाली की, ही जागा आमची वडीलोपार्जित आहे या जागेवर तुमचा कोणताही अधिकार नाही. त्यानंतर महेंद्र कवळे याने आईला मिठी मारली व तिची छाती दाबली. मी आईला त्याच्या तावडीतून सोडवण्याचा प्रयत्न केला. महेंद्र कवळे यांचा तोल जावून ते पडले. त्यानंतर त्यांनी 'बघतो' असे म्हणून निघून

गेले. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी माझा जबाब नोंदवून घेतला. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकेन. तो आज न्यायालयात हजर आहे. **सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझी आई, कलभुर्गे यांच्याविरुद्ध महेंद्र कवळे याने त्याच दिवशी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची केस मी महेंद्रला दगडाने, आईने काठीने झोडी मारल्या व बेकारयदेशीरपणे त्याच्या शेतात गेले अशा स्वरुपाची आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती केस दि. २६/०४/२०२१ रोजी सायं. ४.३० वाजता घडल्या संदर्भातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, महेंद्र कवळे याने आधी तक्रार दाखल केली व त्यानंतर आमची तक्रार घेतली होती.

०३. हे म्हणणे खरे आहे की, वाद जागेचा होता. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५९ जुना गट क्र. २४६/९ या संदर्भातील वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, या जागेची मालकी कोणाची आहे या संदर्भातील वाद चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात त्या संदर्भातील वाद प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, महेंद्र याचे म्हणणे आहे की, ती जागा त्यांनी १९९० साली नोंदणीकृत खरेदीखताने राजाराम मांदळे व सुभाष मांदळे यांच्याकडून खरेदी घेतलेली आहे.

०४. हे म्हणणे खरे नाही की, घटनेपूर्वी आठवडा आधी त्या जागेवर साफसफाईचे काम आम्ही सुरु केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आजूबाजूच्या झाडांची साफसफाई आठवडापूर्वीपासून चालू झाली होती. हे म्हणणे

खरे नाही की, महेंद्र कवळे व त्याच्या वडीलांनी सदर साफसफाईला हरकत घेतली होती. हे मला माहीत नाही की, महेंद्र कवळे याच्या वडीलांनी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात दि. २६/०४/२०२१ रोजी सकाळी आमच्याविरुद्ध अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, महेंद्रचे वडील त्या दिवशी सायं. ४.३० वाजता तेथे नव्हते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, ४.३० वाजता कलभुर्गे याने जेसीबी चालू केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझी आई स्वत: तेथे हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, जेसीबीचे काम चालू झाल्यानंतर बांधावरची छोटीमोठी झाडे तुटली होती. हे म्हणणे खरे नाही की, महेंद्र याने येवून जेसीबी थांबवा म्हणून आम्हाला अडविले होते. हे म्हणणे खरे आहे की, महेंद्र कवळे याने आम्हाला झाडे तोडण्यापासून विरोध केला. हे म्हणणे खरे नाही की, कलभुर्गे याने जेसीबी थांबविले नव्हते. ४.३० वाजल्यापासून ५ ते १० मिनिटे जेसीबी चालू होता. हे म्हणणे खरे आहे की, ५ ते १० मिनिटे जेसीबी थांबवण्यावरुन आमच्यात भांडण चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, जेसीबी थांबत नसल्याने महेंद्र कवळे हा जेसीबीच्या आडवा आला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी महेंद्रची कॉलर पकडली व तेथे असलेला दगड त्याच्या डोक्यात घातला होता. महेंद्र कवळे हा त्याच्या डोक्याच्या मागच्या बाजूला पडला होता. मी व महेंद्र कवळे समोरासमोर होतो असे झाले नाही. मी आईला समोरुन सोडविले होते. मी महेंद्र कवळेला समोरुन सोडवताना त्याचा तोल जावून तो पडला होता.

०६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने महेंद्रला धक्काबुक्की केली होती व काठीने मारहाण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईपेक्षा

महेंद्र लहान आहे. हे म्हणणे खरे आहे की, महेंद्र कवळेने माझ्या आईकडे यापूर्वी वाईट नजरेने पाहिले नव्हते व अपमान केला नव्हता. हे मला माहीत नाही की, महेंद्र नवी मुंबई येथे नोकरीला आहे व फक्त शनिवारी, रविवारी गावाकडे येतो.

०७. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यातील वाद हा शेतीपुरता होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला दगडाने व काठीने मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याविरुद्ध तक्रार झाल्याने आम्ही त्याच्याविरुद्ध खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रकरणाला गांभीर्य येण्यासाठी आईला शिवीगाळ केली व आईला मिठी मारली असा उल्लेख केलेला आहे.

०८. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून मांडवा सागरी पोलीस ठाणे हे पाच मिनिटांच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अंगावर मारहणीच्या खाणाखुणा नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे औषधोपचार घेण्याचा प्रश्न नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तात्काळ तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने तक्रार दिली होती त्यानंतर पोलीसांनी आम्हाला बोलावल्यामुळे आम्ही फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता त्याला शह देण्यासाठी आम्ही खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आईला आरोपीने मिठी मारली, तिचा विनयभंग केला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मारहाण केली होती, हे मी खोटे सांगत आहे.

०९. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी कोणाचीही घरे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी कोणीही येईल अशी परिस्थिती तेथे नव्हती. शशिकांत राणे व महेश राणे यांना आम्ही जेसीबी चालविणार आहोत म्हणून

आधीच बोलावले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, शशिकांत राणे व महेश राणे घटनास्थळी हजर नव्हते.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१४/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७९/२०२१**
निशाणी क्र. **५८/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **विश्वनाथ शरणाप्पा कलभुर्गे**
वय सुमारे : ३५ वर्षे, व्यवसाय : जे.सी.बी.ऑपरेटर
निवासस्थान : मु. कर्नाटक, बिजापूर

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. २६/०४/२०२१ रोजी घटना घडली. माझे सुपरवाजर दयानंद राऊळ यांनी सांगितले की, ओमकार राणे याच्या शेतावरील जंगली झाडे झुडपे काढण्यासाठी जे.सी.बी. घेवून जा. मी सायं. ४:१५ वाजता शेतावर गेलो. ओमकार राणे व प्रतिक्षा राणे तेथे हजर होते. प्रतिक्षा राणे म्हणाली की, आमच्या जागेत येणारी जंगली झाडे झुडपे काढून टाकायची आहेत. मी माझे काम चालू करत असताना एक व्यक्ती काठी घेवून ओमकार राणे व प्रतिक्षा राणे यांना शिवीगाळ करत आला. तो मला म्हणाला की, कोणाच्या परवानगीने तू जे.सी. बी. घेवून जागेत आलास? मला त्याने जे.सी.बी. बंद करण्यास सांगितले. मी त्याला विचारले की तू कोण? त्यावर त्याने तो महेंद्र कवळे असल्याचे सांगितले.

०२. प्रतिक्षा राणे म्हणाली की, आमची वडीलोपार्जित जागा आहे, तू बंद करणारा कोण? महेंद्र कवळे याने ओमकार राणे व प्रतिक्षा राणे यांना मारहाण केली. मारहाण झाल्याने आरडाओरड झाली असता तेथे महेश राणे व शशिकांत राणे आले. मारहाण करत असताना महेंद्र कवळे यांचा तोल गेला व ते पडले व त्यांना डोक्याला दगड लागला. महेंद्र कवळे यांनी प्रतिक्षा राणे यांना मिठी मारली.

सुरेंद्र कवळे आले व त्यांनी पाहिले की, महेंद्र कवळे यांच्या डोक्याला मार लागलेला आहे. ते त्यांना हॉस्पीटलमध्ये घेवून गेले व मला जे.सी.बी. घेवून जाण्यास सांगितले.

०३. मला काठी दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला आर्टीकल 'अ' कडील लाकडी बांबू तोच आहे. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकेन. तो आज न्यायालयात हजर नाही. (आरोपीच्या गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल आहे.)

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत</u>** :

०४. मी राणेंना २० ते २५ वर्षांपासून ओळखतो. मी कवळे यांना ओळखत नव्हतो. मी कवळे यांना पहिल्यांदाच घटनेच्या दिवशी पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, कोणचेही कॉन्ट्रॅक्ट घेतल्यानंतर ते कायदेशीर आहे की नाही हे बघतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला हरकत घेतल्यावर आम्ही काम थांबवतो, वाद घालत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कवळे यांनी मला फक्त काम थांबवायला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडी थांबवून खाली उतरलो होतो. मी भांडणात पडलो नव्हतो.

०५. हे म्हणणे खरे आहे की, दोघांमध्ये आधी शाब्दीक बाचाबाची सुरु झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी हाणामारीसंदर्भात तात्काळ पोलीस ठाण्यात जावून तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याविरुद्धही महेंद्र कवळे यांनी तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी ओमकार राणेविरुद्ध माझ्याविरुद्ध काय तक्रार दिली हे समजून घेतले. हे म्हणणे खरे आहे की, ओमकार राणेने महेंद्र कवळेविरुद्ध काय तक्रार दिली हे समजून घेतले. हे म्हणणे

खरे नाही की, मला ओमकार राणेकडून घटनेबाबत कळाले होते.

०६. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिक्षा राणे ह्या महेंद्रच्या आईच्या वयाच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, धक्काबुक्कीमध्ये प्रतिक्षा राणे यांना लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिक्षा राणे यांना मिठीत घेतल्याचे मी पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिक्षा राणे यांना मिठी मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, लाकडी बांबूने मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे.

०७. हे म्हणणे खरे नाही की, दि. २६/०४/२०२१ रोजी महेंद्र कवळे यांनी आमच्याविद्ध तक्रार केली असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब दि. ०४/०५/२०२१ रोजी घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याविरुद्ध दाखल झालेली केस चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, जंगली झाडे तोडून झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी बेकायदेशीरपणे झाडे तोडली होती. हे म्हणणे खरे नाही की, स्वतःला वाचविण्यासाठी आरोपीवर खोटे आरोप करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे आरोप केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल 'अ' लाकडी बांबू सहज उपलब्ध होवू शकते. काठीवर विशेष खूण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, लाकडी बांबूने मारहाण झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिच काठी होती हे मी खात्रीने सांगू शकत नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. **( एम्. बी. अत्तार )**
दिनांक : **०६/०१/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.